# KNOWLEDGE RESONANCE SPECIAL ISSUE

ISSN : 2231-1629

A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL

(Evaluated in the SJIF Journal Masters List Evaluating Process with Impact Factor of 8.072 for Year 2021 )

A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal


# IMPACT OF SANITATION ON SOCIETY

## 11th MARCH, 2023





GUEST EDITOR

Dr. Revannath Kale

Head & Associate Professor, Department of Sociology,
R.B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed.

| | | |
|---|---|---|
| 41 | **ग्रामस्वच्छता अभियानातील शौचालयाचा इतिहास व भारतातील सद्यस्थितीचा अभ्यास**<br>डॉ. राजू शेषराव पोपळघट | 156 |
| 42 | **आदिवासींचे पर्यावरणीय प्रश्न**<br>डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | 160 |
| 43 | **स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध – एक आढावा**<br>डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर | 164 |
| 44 | **पंचायतराज आणि आरोग्य अभियान**<br>डॉ. चांगदेव निवृती मुंढे | 168 |
| 45 | **ग्रामीण स्वच्छ भारत अभियान**<br>डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे | 172 |
| 46 | **स्वच्छतेचे प्रसारक संत गाडगेबाबा आणि शालेय शिक्षण**<br>तेजस्विनी रामदास तारू | 174 |
| 47 | **स्वच्छ भारत अभियान : एक अभिनव उपक्रम**<br>प्रकाश साहेबराव काळवणे | 177 |
| 48 | **महात्मा गांधी यांचे स्वच्छते विषयक विचार**<br>डॉ. गणेश तुकाराम मोकासरे | 179 |
| 49 | **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ग्रामस्वच्छता व ग्रामआरोग्याबाबत विचार**<br>डॉ. प्रल्हाद दत्तराव भोपे | 181 |
| 50 | **पंचायतराजच्या माध्यमातुन ग्रामस्वच्छता**<br>प्रा. चिमचिमे के. एम* डॉ. गोविंद बावस्कर** | 187 |
| 51 | **ग्रामस्वच्छता आणि महात्मा गांधी**<br>*प्रा. डी.एन. रिठे* | 190 |
| 52 | **स्वच्छ भारत - अभियान**<br>डॉ. आर. डी. खताळ | 192 |
| 53 | **स्वच्छ भारत अभियान**<br>बंडू पाटेकर | 194 |

ISSN 2231-1629 Knowledge Resonance
A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal
IMPACT FACTOR 8.072

# स्वच्छ भारत - अभियान

**डॉ. आर. डी. खताळ**
*कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय*
*शिवाजीनगर गढी, ता. गेवराई, जि.बीड*

**प्रास्ताविक :-**

भारतात 02 ऑक्टोबर 2014 रोजी महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंतीनिमित पंतप्रधान नरेंद्र मोदी या राजपथ नवी दिल्ली येथे भारत स्वच्छ अभियानाची सुरुवात केली आणि भारत स्वच्छ अभियानाला देशव्यापी चळवळीचे स्वरुप देण्यात आले. भारतातील स्वच्छतेच्या चळवळीचे नेतृत्व करताना देशातील जनतेने महात्मा गांधीचे स्वच्छ आणि निरोगी भारताचे स्वप्न पुर्ण करावे अशा प्रकारचे आवाहन केले. पंतप्रधानांनी जनतेला ना गंदगी करेंगे, ना करने देंगे चा निरा दिला. या प्रसंगी पंतप्रधानांनी एकुण नऊ व्यक्तींना स्वच्छता मोहिमेचे दुत म्हणुन घोषित केले. तसेच या व्यक्तींना आणखी नऊ व्यक्तींना स्वच्छतेचे दुत बनविण्यात सांगितले. अशा पद्धतीने देशातील जनतेच्या सहभागामुळे स्वच्छ भारत अभियानाचे रुपांतर एका राष्ट्रीय चळवळीमध्ये झाले. अशा प्रकारच्या चळवळीमुळे लोकामध्ये जबाबदारीची भावना निर्माण झालेली आहे. लोकांच्या सक्रीय सहभागामुळे महात्म गांधीचे स्वच्छ भारतचे स्वप्न लवकरच सत्यात येण्यास मदत होणार आहे. पंतप्रधानांनी स्वतःच्या कृतीतून जनतेच्या स्वच्छ भारत अभियानाचा संदेश दिला. पंतप्रधानांनी वाराणसीमध्येही स्वच्छता मोहिम राबविली. स्वच्छ भारत अभियानाला अंतर्गत त्यांनी गंगा नदीच्या अस्थी घाटावर अभियानाची सुरवात केली. यात तेथील स्थानिक नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेतला. त्यावेळी पतप्रधानांनी स्वच्छतेचे महत्व सांगतानाच देशातील अनेक कुटूंबाकडे शौचालये नसल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या विषयी माहिती सागितली.

भारतातील स्वच्छते बाबतच्या या चळवळीमध्ये समाजातील सर्व स्तरातील लोकांचा सहभाग होता. सरकारी कर्मचारी, लष्करातील जवान, अभिनेते, खेळाडु, उद्योजक, अध्यात्मिक गुरु या कामासाठी पुढे आहे. भारत स्वच्छ अभियानात लोकांचा सहभाग, विविध विभाग, संघटनांनी राबविलेले याबद्दल पंतप्रधानांनी कौतुक केले. स्वच्छ भारत हा उपक्रम समाज माध्यमावर सुरु करण्यात आला. लोकांच्या प्रतिसादामुळे स्वच्छ भारत अभियानाला चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. रस्ते साफ करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, शौचालयांची स्वच्छता व निरोगी वातावरण यासाठी झाडू हाती घेणे हा स्वच्छ भारत अभियानाचा भागच बनला आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :-**

स्वच्छ भारत अभियान या शोधनिबंधा बाबतची उद्दिष्टे खालीलप्रमाणे -

1. स्वच्छ भारत अभियानाचा अभ्यास करणे.
2. स्वच्छ भारत अभियानांचे महत्व विशद करणे.

**शोध निबंधाची गृहितके :-**

या शोधनिबंधाबाबतची स्वच्छ भारत अभियान गृहितके खालीलप्रमाणे -

1. स्वच्छ भारत अभियान ही व्यापक संकल्पना आहे.
2. स्वच्छ भारत अभियानाचे महत्व अनन्य साधरण आहे.

**संशोधन पद्धती :-**

पस्तुत शोध निबंधासाठी संशोधनातील दुय्यम तथ्यसंकलन तथ्यसंकलन तंत्राचा अवलंब केलेला असुन त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, संदर्भिय पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. यावरुन प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन करण्याचा पयत केलेला आहे.

भारत सरकार 1999 मध्ये संपुर्ण स्वच्छता अभियान सुरु केले. नंतर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी निर्मल भारत असे नामकरण केले. पण स्वच्छ भारत अभियानाला पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखाली संजिवनी मिळाली. आपल्या शपथविधीमध्ये शौच आणि स्वच्छता याबाबत बोलणारे ते पहिलेच पंतप्रधान असावेत. पंतप्रधान मोदींनी राष्ट्रीय पातळीवर मोहिम राबविली आणि नागरिकांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले. यामुळे भारतातील लोक स्वच्छतेबाबत बोलु लागले. स्वच्छ भारत अभियानाने भारतातील स्वच्छता आणि त्याच्याशी निगडीत विविध कामावर प्रभाव पडला. भारत स्वच्छ अभियान मोहिमेची स्वतःची अधिकृत वेबसाईट आणि ॲप आहे. या ठिकाणी आपण या मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेता येतो.

आजपर्यंत 11,408,280 घरात शौचालये बांधले गेले. 143,491 गावे 79 जिल्हे आणि 3 राज्ये खुल्यावरील शौचापासून मुक्त झाली आहेत. विविध राजकारणी, अभिनेते, सामाजिक कार्यकर्ते आणि क्रिकेटपटूंनी या मोहिमेत सहभाग घेतला होता आणि अभियानाची क्षमता आणि पोहोच वाढली. सचिन तेंडुलकर, कमल हसन, अनिल अंबानी, विराट कोहली, प्रियंका चोपा आणि अशा अनेक व्यक्तींनी हातात झाडू घेवून रस्ते साफ केले.

स्वच्छ भारत अभियान मोहिमेत केलेल्या जागृतीने अनपेक्षित बदल घडवुन आणले आहेत. भारतीय चित्रपट सृष्टीतील विविध सुपरस्टार यांनी या मोहिमेसाठी विविध प्रकारे सहकार्य केलेले दिसुन येते.

**स्वच्छतेचे महत्व :-**

मानवाच्या जीवनात स्वच्छतेचे महत्व अनन्यसाधारण असते. स्वच्छ परिसर हवा, पाणी, वातावरण चांगले असणे आवश्यक असते. यामुळे आजार, विविध प्रकारचे रोग पसरत नाहीत. परिणामी माणसांची जीवन शैलीतच फरक होतो. स्वच्छ परिसरातील लोक सकाळी मोर्नीग वॉक किंवा जॉगींगला अधिक दिसतात. अशा प्रकारच्या चांगल्या सवयींचा परिणाम आपल्या जीवनावर होतो. स्वच्छ मोकळ्या जागेत, अंगणात मुले खेळतात. आपल्याकडील मोबाईल, गेम, टि.व्ही. यापासुन दुर होऊन मैदानात येतात. शारिरीक खेळ, मैदानी खेळ खेळतात. त्यामुळे त्यांच्यात ॲक्टीव्हपणा अधिक येतो. मुलै मैदानात आल्याने त्यांच्यावरील अभ्यासाचा ताण कमी होतो म्हणुन घराबरोबरच परिसराची आणि पर्यावरणाच्या स्वच्छतेसाठी मानवाच्या दृष्टीने अधिक महत्वाचा आहे. पण काही वेळ स्वच्छता ठेवणे हे सरकारचे काम समजुन त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. पण स्वच्छता हे सरकारचे काम नाही. पण जबाबदारी जरुर आहे. सरकारने योग्य त्या सुविधा पुरविल्या पाहिजेत. पण आपण जोपर्यंत आपण स्वच्छता प्रिय होत नाहीत, स्वच्छतेचे महत्व फायदे जाणुन घेत नाहीत तोपर्यंत बदलाची अपेक्षा करणे व्यर्थच ठरते. जर आपल्याला स्वच्छ भारताचे स्वप्न पुर्ण करावयाचे असेल तर सरकार आणि आपल्याला एकत्र येवुन सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाचा भाग व्हावा लागेल.

**समारोप :-**

भारतातील स्वच्छता अभियानातुन एकदम मोठे परिवर्तन होईल असा आशावाद बाळगणे योग्य नाही. ते अवास्तव ठरेल. प्रथमतः भारतीय समाजातील लोकांना बदलाची सवय लागणे आवश्यक आहे. स्वच्छता हे कवळ एखाद्या सरकारचे काम नाही तर त्याला समाजाची साथ मिळणे आवश्यक आहे. आपल्यात स्वच्छतेची, सुंदरतेची आवड निर्माण झाली पाहिजे. याशिवाय दुसरा मार्ग नाही. स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात सरकार आणि नागरिक यांच्या एकीकरणातून झाली परंतु आता दिसते की फक्त सरकारचे काम आहे तर सर्वसामान्य जनता साथ सोडत आहे. अशा प्रकारची देशव्यापी कार्य साध्य करण्यासाठी सरकारी आणि सामान्य जनतेची भागिदारी आवश्यक आहे. याशिवाय हे अभियान यशस्वी होणार नाही. सरकार त्यांचे काम करत आहे. पण जनतेने आपली कर्तव्य पार पाडली पाहिजेत. लोकशाहीत आपल्याला अधिकार मिळतात परंतु आपण हे विसरतो की अधिकारा बरोबर कर्तव्यही येतात. आपण आपली कर्तव्य विसरतो आणि केवळ अधिकारांसाठी आंदोलन करतो. भारत स्वच्छ करण्यासाठी आपण लोकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. याशिवाय स्वच्छ भारत अभियान यशस्वी होणे अशक्यप्राय ठरते.

**संदर्भ :-**

1. राष्ट्रीय ग्रामस्वराज योजना - ग्रामविकास मंत्रालय, मुंबई.
2. डॉ. अखिलेश व डॉ. शुक्ला - भारत मे ग्रामीण विकास
3. जेम्स ए.जे. व पी. गोपालन - स्टेटस ओफ वॉटर ॲण्ड सॅनिटेशन इन महाराष्ट्र अहवाल (2004)
4. डॉ. आघाव दत्तात्रय - ग्रामीण विकास आणि योजना
5. दैनिक लोकमत, एकमत, लोकसत्ता इत्यादी